दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

www.raigadnagari.com
/ raigadnagari

दैनिक रायगड नगरी

जाहिरातीचे उत्तम माध्यम

या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.

Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

वर्ष २० वे | अंक २१९ | MAHMAR/2006/17212 | रायगड | बुधवार, दि.५ नोव्हेंबर २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

# २४६ नगरपरिषदा, ४२ नगरपंचायतीसाठी निवडणूक जाहीर

**दै.रायगड नगरी । मुंबई**

सर्वोच्च न्यायालयाने ३१ जानेवारी २०२५ पूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे निर्देश दिलेत. या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाकडून २४६ नगरपरिषदा, ४२ नगरपंचायतीसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. येत्या २ डिसेंबर २०२५ रोजी यासाठी मतदान होईल तर ३ डिसेंबर २०२५ रोजी मतमोजणी होईल. या निवडणुकीत १ कोटीहून अधिक मतदार मतदान करतील. या निवडणुका इलेक्ट्रॉनिक मशीन आणि बॅलेट युनिट वापरण्यात येतील अशी घोषणा राज्य निवडणूक आयोगाने केली आहे.



याबाबत राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे म्हणाले की, २४६ नगरपरिषदा, ४२ नगरपंचायतीच्या निवडणुका राज्य निवडणूक आयोगाकडून घेण्यात येत आहे. ६८५९ सदस्य यातून निवडून येणार आहे. १४७ नगरपंचायती आहेत त्यापैकी ४२ नगरपंचायतीसाठी निवडणूक होत आहे. नगरपंचायतीत एका प्रभागात २ जागा असतात. उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन स्वीकारले जातील. एका उमेदवाराला जास्तीत जास्त ४ प्रभागात अर्ज दाखल करता येतील. उमेदवारी अर्जासोबत जातवैधता प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे. जर एखाद्याने जातवैधतेसाठी अर्ज केला असेल तर त्याची पावती लागेल. मतदान केंद्रनिहाय याद्या ७ नोव्हेंबरला प्रकाशित होईल. १ कोटी ७ लाख ३ हजार ५७६ मतदार आहेत असं त्यांनी सांगितले.

तसेच कोकण विभाग - २७, नाशिक - ५९, पुणे - ६०, नागपूर - ५५ अशा नगरपरिषदा,नगरपंचायतीच्या निवडणुका होतील. १३ हजार ३५५ मतदान केंद्रावर ही निवडणूक होईल. २८८ अध्यक्षपद, ३८२० प्रभाग, ६८५९ सदस्य यासाठी ही निवडणूक होणार आहे. मतदान केंद्रातील इमारतीत मोबाईल नेता येईल परंतु मुख्य कक्षात मोबाईल नेता येणार नाही. ६६ हजार निवडणूक अधिकारी, कर्मचारी यासाठी काम करत आहेत अशी माहितीही दिनेश वाघमारे यांनी दिली आहे.

दुबार मतदारांपर्यंत राज्य निवडणूक आयोगाचे कर्मचारी पोहचतील. मतदारांना मतदान केंद्रे आणि नाव शोधण्यासाठी खास -झझ बनवण्यात आले आहे. दुबार मतदारांसमोर डबल स्टार करण्यात आलेले आहेत. असा मतदार केंद्रावर आल्यानंतर त्यांच्याकडून प्रतिज्ञापत्र घेतले जाईल. त्याला एकाच केंद्रावर मतदान करता येईल असं दिनेश वाघमारे यांनी म्हटलं.


# पोलीस असल्याची बतावणी करणाऱ्या सराईत गुन्हेगारास गुन्हे शाखेकडून अटक

## १ कोटी २५ लाख १० हजार ८६८ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पोलीस असल्याची बतावणी करून नागरिकांना लुटणार्या गुन्हेगारास गुन्हे शाखेकडून अटक करण्यात आली असून सदर गुन्हेगारांकडून १५ गुन्हे उघडकीस आणण्यास पोलिसांना यश आले अहे.

पोलीस आयुक्त, नवी मुंबई, मिलिंद भारंबे, पोलीस सह. आयुक्त, संजय येनपुरे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), दीपक साकोरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), सचिन गुंजाळ यांनी पोलीस बतावणीचे गुन्हयांना प्रतिबंधक करणेकामी व घडलेले गुन्हे उघडकीस आणणेबाबत सुचना दिलेल्या होत्या. दिनांक ३१/०७/२०२५ रोजी वनकुमार रामअवतार केजरीवाल, वय ६८ हे खारघर परिसरात घरगुती सामान आणण्यासाठी गेले असता त्यांना रस्त्यात थांबवून अनोळखी आरोपीने पोलीस असल्याचे सांगुन, पोलीस आय डी कार्ड दाखवून रमेश पाटील या व्यक्तीस त्याच्या घरी गांजा सापडल्यामुळे पोलीसांनी तुरुंगात टाकले आहे. असे खोटे सांगुन त्यांचे गळयातील सोन्याची चैन व हातातील अंगठी सर्व बॅग मध्ये ठेवण्यास सांगून आरोपीने १,५०,०००/- रू कि. ची दागिने हातचालाखीने चोरून नेले. म्हणुन खारघर पोलीस ठाणे गु.र.नं.३२२/२०२५ बी.एन.एन.एस कलम २०४,३१८(४) प्रमाणे गुन्हा नोंद केला.



वरील नमुद गुन्हयाचे घटनास्थळी कक्षाकडील अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ भेट देवुन घटनास्थळ परिसरातील सीसीटीव्ही फुटेज मधील आरोपीचे लोणावळा व पिंपरी चिंचवड या येण्या जाण्याचे मार्गावरील साधारण २० ते २५ दिवस सतत फुटेजची पाहणी करून आरोपीतांची टी. व्ही. एस. अपाची मो. सायकल क्रमांक MH 15 B- 1617 निष्पन्न केली. सदर वाहनाबाबत गोपनिय बातमीदारामार्फत माहिती प्राप्त करून वरिष्ठांचे पुर्वपरवानगीने दिनांक १२/१०/२०२५ रोजी पुणे येथे जावून आरोपी नामे सज्जाद गरीबशहा इराणी याचा स्थानिक पोलीसांचे सहाय्याने शोध घेत असताना आरोपीची पत्नी ही चोरीच्या सोन्याच्या दागिन्यांची विल्हेवाट लावणेकरीता जात असताना मिळुन आली. आरोपीची पत्नी फिजा सज्जाद इराणी हिचे ताब्यातून एकुण ११८६ ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या बांगडया, नेकलेस, मंगळसुत्र, चैन, कानातील झुमके, ब्रेसलेट, पेंडंट, अंगठ्या असे दागिने व बनावट आयडी कार्ड, आधारकार्ड, पॅनकार्ड असा मुद्देमाल मिळुन आला. त्याचप्रमाणे आरोपीने गुन्हयात वापरलेली वर नमुद मोटार सायकल आरोपीचे राहत्या घराजवळुन ताब्यात घेतली. अशा प्रकारे सदरचा गुन्हा उघडकीस अणुन एकुण १,२५,१०,६८६/- रू कि.चा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

नमुद गुन्हयातील आरोपीत सज्जाद गरीबशहा इराणी याने त्याचे साथीदारांसह नवी मुंबई परिसरात गुन्हे केल्याची कबुली दिली असुन त्याचे निवेदनाप्रमाणे पोलीस असल्याची बतावणी केलेले एकुण १५ गुन्हे उघडकीस आलेले आहेत. नमुद आरोपी हा सराईत गुन्हेगार असुन त्यावर एम.सी.ओ. सी कायदयाअंतर्गत व इतर १०० हुन अधिक गुन्हे दाखल असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

# जंजिरा किल्ला तब्बल नऊ दिवसांनी पर्यटकांना खुला झाला

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुड जंजिरा किल्ला पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात पर्यटकांची मांदियाळी येत असते. अचानक हवामानात बदल झाल्यामुळे शिडाच्या बोटी बंद करण्याचा निर्णय बंदर खात्याने घेतला. त्यामुळे जंजिरा किल्ला नवु दिवस बंद राहिल्याने आलेल्या लाखो पर्यटकांना किल्लया पाहण्यास न मिळाल्याने हिरमोड झाल्याचे पाहावयास मिळाले. अखेर दिनांक ०३ रोजी तब्बल नऊ दिवसांनी पर्यटकांना जंजिरा किल्ला पाहण्यासाठी खुला झाला आहे असे पुरातत्व विभागाचे बहुउद्देशीय कर्मचारी प्रकाश घुगरे यांनी सांगितले आहे.

रायगड जिल्ह्यातील मुरुड तालुक्यातील राजपुरी येथे असलेला जगप्रसिद्ध जंजिरा किल्ला पाण्यासाठी दिवाळी सुट्टीतील वीकेंडला पर्यटकांची मोठी गर्दी झाली होती. परंतु हवामान खात्याने दिलेल्या इशारानुसार अच-ानक हवामानात बदल घडून आले व समुद्रातील हवेने वेग धरला त्यामुळे शिडाच्या बोटी समुद्रात चालवणे अवघड होऊ लागले. दुरून दुरून आलेल्या पर्यटकांना कोणत्याही प्रकारचा धोका उद्धवू नये म्हणून त्यांच्या सुरक्षतेसाठी बंदर विभागाने बोटी बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला.

मुंबई ठाणे पालघर पुणे सांगली सातारा कोल्हापूर रत्नागिरी नाशिक नागपूर अहमदनगर अकोला बुलढाणा सह अनेक जिल्ह्यातून व महाराष्ट्र बाहेरून सुद्धा पर्यटक मोठ्या प्रमाणात आलेले दिसून येत होते. या आलेल्या पर्यटकांच्या आनंदावर हवामानाने अचानक विर्जन टाकले त्यामुळे मोठ्या प्रमाणात पर्यटकांची हिरमोड झाल्याचे दिसून आले. दिनांक ०३ नोव्हेंबर रोजी बोटी सुरु करण्यात आल्याने तब्बल नऊ दिवसांनी पर्यटकांना किल्ला पाहण्यासाठी सुरू केला आहे. या किल्लयाच्या मागील बाजूस ब्रेक वाटर बंधारा टाकून त्या ठिकाणी जेट्टी उभारण्यात आलेले आहे. ती लवकरात लवकर सुरू करावी जेणेकरून पर्यटकांना सुरक्षित किल्ला पाहता येईल अशी मागणी पर्यटकांमधून व स्थानिकांमधून जोर धरत आहे.



# स्थानकाला गव्हाण-जासई स्थानक नाव द्या

## अन्यथा आंदोलन करण्याचा जासई ग्रामस्थांचा इशारा



**दै.रायगड नगरी । उरण**

नेरुळ/ बेलापूर ते उरण या लोकल मार्गावरील गव्हाण रेल्वे स्थानकाला गव्हाण जासई नाव न देता स्थानकाच उदघाटन केल्यास जासई ग्रामस्थ आंदोलन करतील असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

सोमवारी सिडको कार्यालयात जाऊन या संदर्भात जासई ग्रामपंचायतीचे सरपंच संतोष घरत यांनी १३ जुलै २०२३ च्या सिडकोच्या ठरावानुसार नामविस्तार करावा अशी मागणी केली होती. ती पूर्ण न करताच उरण ते नेरुळ/बेलापूर मार्गावरील गव्हाण व तरघर या दोन्ही स्थानकांच्या उदघाटनाची तयारी पूर्ण करण्यात आली आहे. केंद्रीय रेल्वे मंत्र्यांच्या हस्ते हे उदघाटन करण्यात येणार आहेत. मात्र गव्हाण जासई अशी नामविस्तार करण्याची मागणी असतांनाही गव्हाण रेल्वे स्थानकाच्या फलकावर केवळ गव्हाण नाव लिहण्यात आले आहे. त्यामुळे जासई ग्रामस्थांमध्ये प्रचंड असंतोष पसरला आहे.

या स्थानकासाठी गव्हाण आणि जासई या दोन्ही गावांची जमीन संपादीत करण्यात आली आहे. हे भूसंपादन होत असताना जासई ग्रामस्थांनी व ग्रामपंचायतीने सिडकोकडे गव्हाण जासई नामकरणाची मागणी केली होती. तसा ठराव करून सिडको कडून रेल्वे विभागाकडे करण्यात आला होता. मात्र तरीही नामविस्तार न केल्याने सिडकोला जाब विचारण्यासाठी जासई ग्रामपंचायतीच्या वतीने विचारणा करण्यात आली अशी माहीती जासई ग्रामपंचायत सरपंच संतोष घरत यांनी दिली. यावेळी जासई ग्रामपंचायत सदस्य धीरज घरत ,आदित्य घरत जासई ग्रामस्थ विनायक घरत ,संतोष कृष्णाजी घरत ,अभिषेक घरत आदी उपस्थित होते.

# शेअर मार्केट ट्रेडिंगमध्ये परतावा न दिल्यावरून आत्महत्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महिलेला मानसिक त्रास देऊन पैशांकरता तिच्या मागे तगादा लावून आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी रवी हरेशभाई भडका, रा. सुरेंद्रनगर, गुजरात नावाच्या व्यक्तीविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

अनघा पाटील यांची शेअर मार्केट ट्रेडिंग ऑनलाईन कोर्समध्ये रवी भडका यांच्याशी ओळख झाली. त्यानुसार त्यांनी यात पैसे गुंतवले. रवी भडका याने परतावा म्हणून काही रक्कम त्यांच्या बँक खात्यात परत केले. मात्र ठरल्याप्रमाणे परतावा येत नसल्याने अनघा, तिचा पती हे रवी भडका याला वारंवार संपर्क करून परतावा परत देण्याबाबत संपर्क करत होते. मात्र तो वारंवार वेगवेगळी कारणे सांगून टाळाटाळ करत होता.

रवी भडका हा परतावा देत नसताना सुद्धा अनघा हिला मानसिक त्रास देऊन तिच्याकडून आणखी रक्कम घेतली. या मानसिक त्रासातून अनघा हिने गळफास घेऊन आत्महत्या केली. याप्रकरणी रवी हरेशभाई भडका याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# अलिबाग - रोहा मार्गावरील पूल पडण्यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांच्या विरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा करा : ॲड.राकेश पाटील

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

अलिबाग रोहा रस्त्यावरील वढावं गावाजवळ पूल अच-ानक तुटला त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांच्या विरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याच्या संदर्भात तक्रार करण्यात आली ,त्यामध्ये अलिबाग रोहा रस्ता हा सध्या साक्षात यमदेवाच्या ताब्यात असल्याचे व प्रत्येक खड्डयात यमदेव बसल्याचे आम्हाला प्रवास करताना भासत आहे. अलिबाग - रोहा रस्ता हा निवडणूकीसाठी हक्कांचे नारळ. फोडण्यासाठी सर्वच राजकीय पक्षांसाठी आणि मतांसाठी केंद्रबिं दू ठरला आहे.

रायगड जिल्ह्यातील रस्त्यांची अवस्था पाहता जिल्हाधिकारी या अधिकाराने आपण जुलै २०२५ मध्ये जनतेच्या, प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी सर्व वरिष्ठ अधिकाऱ्याची रस्त्यांच्या संदर्भात आढावा बैठक बोलावली होती. सदरच्या आढावा बैठकीमध्ये रस्ते दुरूस्तीअभावी अपघात घडल्यास संबंधित यंत्रणांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात येईल असे निर्देश आपण संबंधित अधिकाऱ्यांना दिले होते. सदरच्या आढावा बैठकीचा आधार घेऊ न मी आपल्याकडे प्रवासी या नात्याने सदरचा तक्रार अर्ज करित आहे.

अलिबाग - रोहा रस्ता व रस्त्यांवर असणारे साकव (पूल) हे प्रवासासाठी व वाहतूकीसाठी सुरक्षित असल्याचा विश्वास ठेवूनचा आम्ही इतके दिवस प्रवास करीत होतो. परंतू, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्या तसेच साकव (पूल) वाहतूकीस योग्य असल्याचे प्रमाणपत्र देणारे अधिकारी तसेच रस्त्याचे काम करणारे ठेकेदार यांच्या बेजबाबदारपणामुळे तसेच कर्तव्यात कसूर केल्यामुळे काल दिनांक ०३/११/२०२५ रोजी साकव पडण्याची दुर्दैवी घटना घडली आहे. सदरच्या दुर्घटनेमध्ये आमच्या वावे गावचा तरूण कु. स्वप्निल रामचंद्र गायकर व त्याच्या गाडीवर बसलेली महिला या पुलाच्या दुर्घटनेत सापडले असुन मरता-मरता वाचले आहेत. त्याच्यावर जिल्हा सार्वजनिक रुणालयात उपचार सुरू आहेत. वर नमुद अधिकाऱ्याच्या बेजबाबदारपणामुळे पुलाची दुर्घटना घडली आहे.

सदरच्या या अधिका-यांच्या बेजबाबदार कामामुळे अलिबाग - रोहा मार्गावरील प्रवास करणा-या प्रवाशांना, कामगारांना, विद्यार्थ्यांना नाहक त्रास तसेच आर्थिक झळ सोसावी लागत आहे. जर या साकवाची या अगोदरच पाहणी केली असती तर आज एवढी मोठी दुर्घटना झालीच नसती. या दुर्घटनेस संबंधित अधिकारी जबाबदार आहेत.

सदरचा पूल पडण्याची दुर्घटना ही नैसर्गिक आपत्ती नसून सदरच्या रस्त्यावरून ५ टनापेक्षा जास्त वजन असलेली गेल कंपनिची अवजड वाहने मोठया प्रमाणात वाहतूक करतात यामुळे बेलकडे ते उसर या रस्त्यावर असलेले साकव तसेच मोऱ्या खचल्या आहेत. तरी ही वाहतूक बंद केव्हा होणार ? त्यामुळे सदरच्या दुर्घटनेस जबाबदार असणारे सा.बां. विभागाच्या अभियंत्या तसेच पूल वाहतूकीस योग्य असल्याचे प्रमाणपत्र देणारे अधिकारी तसेच रस्त्याचे काम करणारी ठेकेदार कंपनी व त्याचा मालक यांच्याविरुध्द भारतीय न्यायसंहिता २०२३ प्रमाणे सदोष मनुष्यवधाचा तात्काळ गुन्हा दाखल करण्याचे आदेश स्थानिक पोलीसांना देऊन साकवाचे बांधकाम तात्काळ युध्दपातळीवर करून प्रवाशांकरिता सदर मार्ग सुरळीत सुरू करण्यात यावा, या बाबतची तक्रार जिल्हाधिकारी रायगड यांच्याकडे देण्यात आली आहे.



# किंग चार्ल्स यांनी भावाला काढलं घराबाहेर

होणार, होणार म्हणून ज्याचा कधीपासून अंदाज वर्तविला जात होता, ती ब्रिटनच्या राजघराण्यातील ऐतिहासिक घटना अखेर घडली आहे आणि त्यामुळे ब्रिटिश राजघराण्याला पुन्हा एकदा काळिमा फासला गेला आहे. ब्रिटनमध्ये किंग चार्ल्स यांनी आपल्या लहान भावाकडून; अँड्रयूकडून, 'प्रिन्स' हा किताब आणि त्यांच्या सगळ्या शाही पदव्याच परत घेतल्या नाहीत, तर त्यांना विंडसरमधल्या त्यांच्या आलिशान 'रॉयल लॉज' या घरातूनही बाहेर पडायचा आदेश दिलाय.

६५ वर्षीय अँड्रयू यांचं नाव बऱ्याच काळापासून अमेरिकन गुन्हेगार जेफ्री एप्स्टिनसोबत जोडलं गेलं आहे. 'जेफ्री एप्स्टिन सेक्स स्कॅंडल' हे आधुनिक काळातील सर्वांत मोठ्या आणि धक्कादायक गुन्हेगारी प्रकरणांपैकी एक मानलं जातं, कारण त्यात सत्ताधारी आणि प्रभावशाली व्यक्तींनी अनेक अल्पवयीन मुलींचं शोषण केलं होतं. एप्रिल २०२५मध्ये आत्महत्या केलेल्या ४१ वर्षीय व्हर्जिनिया गिफ्रेनं प्रिन्स अँड्रयू यांच्यावर लैंगिक शोषणाचा आरोप केला होता. तिचं म्हणणं होतं, ती १७ वर्षांची असताना २००१मध्ये प्रिन्स अँड्रयूनं तिचं लैंगिक शोषण केलं होतं. त्याबद्दल तिनं प्रिन्स अँड्रयू यांना कोर्टातही खेचलं होतं आणि त्याबद्दल अँड्रयू यांनी तिला भलीमोठ्ठी रक्कमही दिली होती. ही रक्कम किती होती ते मात्र कळू शकलेले नाही. याशिवाय अँड्रयू यांनी व्हर्जिनियाच्या धर्मादाय संस्थेलाही मोठं डोनेशन दिलं होतं. या महिन्याच्या सुरुवातीला अँड्रयू यांना 'ड्यूक ऑफ यॉर्क' हा किताब वापरण्यावरही बंदी घातली गेली होती. बकिंगहॅम पॅलेसनं जारी केलेल्या निर्देशानुसार, शाही पदव्या काढून घेतल्यानंतर, शाही घर सोडावं लागल्यानंतर प्रिन्स अँड्रयू यांना आता 'अँड्रयू माउंटबॅटन-विंडसर' या नावानं ओळखलं जाईल. आतापर्यंत त्यांना 'प्रिन्स अँड्रयू ड्यूक ऑफ यॉर्क' म्हणून ओळखलं जात होतं. 'माउंटबॅटन-विंडसर' हे नाव १९६० साली तयार करण्यात आलं होतं. हे नाव दिवंगत महाराणी एलिझाबेथ दुसऱ्या आणि त्यांचे पती प्रिन्स फिलिप या दोघांच्या कौटुंबिक नावांपासून तयार करण्यात आलं आहे. अँड्रयू २००३पासून रॉयल लॉजमध्ये राहत होते. ३० खोल्यांचं हे आलिशान घर विंडसर परिसरात आहे. इथेच अँड्रयू यांच्या माजी पत्नी सारा फर्ग्युसनही त्यांच्यासोबत राहायच्या. या दोघांचा १९९६ मध्ये घटस्फोट झाला होता. प्रिन्स चार्ल्स यांच्या आदेशामुळे फर्ग्युसन यांनाही आता रॉयल लॉज रिकामं करावं लागणार आहे. दोघांनाही राहण्यासाठी वेगळी, खासगी व्यवस्था करावी लागेल. ब्रिटिश इतिहासात असं फार कमी वेळा घडलं आहे की, एखाद्या राजकुमार किंवा राजकुमारीकडून 'प्रिन्स' अथवा 'प्रिन्सेस' हा किताब काढून घेतला गेला आहे. याआधी १९१९मध्ये हॅनोव्हरचे प्रिन्स अर्नेस्ट ऑगस्टस यांचा ब्रिटिश किताब काढून घेतला गेला होता, कारण त्यांनी पहिल्या महायुद्धात जर्मनीला साथ दिली होती. आता शंभर वर्षांहून अधिक काळानंतर किंग चार्ल्सनं असं कठोर पाऊल उचललं आहे. गेल्या काही काळापासून ब्रिटिश राजघराण्यावर दबाव वाढत होता की, अँड्रयू यांना त्यांच्या आलिशान रॉयल लॉज घरातून बाहेर काढावं. या प्रकरणामुळे अँड्रयू यांना काही दिवसांपूर्वीच आपली 'ड्यूक ऑफ यॉर्क' ही उपाधी सोडावी लागली होती.

# तळा पंचायत समिती सभापती आरक्षणामुळे राजकीय पक्षांसमोर पेच

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा तालुक्यामध्ये पंचायत समिती आरक्षण अनुसूचित जमातीसाठी राखीव झाल्याने दिग्गज गोत्यात आले आहेत पंचायत समितीचे सभापती होण्याचे स्वप्न पाहणाऱ्यांचा पत्ता कट झाला आहे. यामुळे सर्वच पक्षांना उमेदवार शोधण्याची वेळ आली आहे.नव्याने अस्तित्वात आलेल्या रहाटाड पंचायत समिती गणात गिरणे, मेढे, रहाटाड, पिटसई, शेणवली या पाच ग्रामपंचातीचा समावेश होतो या पाचही ग्रामपंचायतीवर राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता आहे. या गणातील आरक्षण अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी राखीव आहे या गणातून जो निवडून येणार आहे, तो थेट पंचायत समितीचा सभापती होणार आहे त्यामुळे सर्वच राजकीय पक्षांनी या पंचायत समिती गणाकडे लक्ष केंद्रित केले आहे.

पंचायत समिती सभापती आरक्षणामुळे तळा तालुक्यात राजकीय समीकरणांमध्ये मोठा बदल झाला आहे.या बदलांमुळे जुने नेते अडचणीत आले असून नव्या चेहऱ्यांना संधी मिळण्याची शक्यता आहे.त्यामुळे तळा तालुक्यात नेतृत्वाचा पेच वाढला असून निवडणुकीत कोण पुढे येईल याकडे लक्ष लागले आहे.तळा तालुक्याच्या राजकारणाभोवती सध्या राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) केंद्रस्थानी आहे. हा गट स्वतःच्या बळावर निवडणुका लढवण्याची क्षमता ठेवतो; मात्र,शिवसेना शिंदे गटाचे भरतशेठ गोगावले यांना मंत्रिपदी संधी दिल्यानंतर त्यांनी रायगड जिल्ह्यात पक्ष वाढीवर भर दिला आहे तळा तालुका देखील याबाबतीत मागे नाही त्यामुळे निवडणुकीपूर्वी थंडावलेले राजकारण आता शिंदे गटामुळे तापणार यात कुठलीही शंका व्यक्त केली जात नाही.

शिंदेंच्या शिवसेनेकडून रहाटाड पंचायत समिती गणात लक्ष केंद्रित केले असल्याचे दिसून येत आहे ना.भरतशेठ गोगावले यांच्या मुख्य उपस्थितीत शिवसेना पक्ष प्रवेश सोहळा गणेश मंगल कार्यालयात चार दिवसांपूर्वी पार पडला या पक्ष प्रवेशासाठी तुफान गर्दी झाली होती यावेळी सर्वच समाजातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती.तळा पंचायत समितीच्या स्थापनेपासून राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्चस्व कायम राहिले असले तरी ना.भरतशेठ गोगावले यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवणारा मोठा वर्ग या पंचायत समिती गणात असल्याने पंचायत समितीचा सभापती हा शिवसेनेचाच बसणार असा विश्वास शिवसैनिक व्यक्त करत आहेत.पंचायत समितीचा सभापती आरक्षण अनुसूचित जमाती असल्यानं राजकीय पक्षांसमोर पेच निर्माण झाला आहे. उमेदवार शोधण्याची वेळ आली असताना शिवसेनेकडे संभाव्य उमेदवार म्हणून अनेक इच्छुक तयार आहेत राष्ट्रवादी काँग्रेस कडून अनपेक्षितपणे एखादे नावं समोर येण्याची शक्यता आहे.२०१२ मध्ये या पंचायत समिती गणातून काँग्रेसच्या भारती इंगळे या निवडून गेल्या होत्या,त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसला पहिल्यांदाच पराभवाला सामोरे जावे लागले होते त्याची पुनरावृत्ती होणार की राष्ट्रवादी काँग्रेस आपला गड राखणार याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागून आहे.

# मारहाण करून गाडीचे केले नुकसान

**दै.रायगड नगरी । पनवेल**

लाथाबुक्यांनी मारहाण करून गाडीची तोडफोड केल्याप्रकरणी चौघाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात एक नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

लतीफ शेख हा वाावेघर येथे राहत असून त्यांनी ३१ ऑक्टोबर रोजी रात्री अकराच्या सुमारास नांदगाव येथील समीर भंगारवाला याच्या दुकानात त्याचा मुलगा रेहान याला मोबाईलवर कॉल करून त्याची हालचाल विचारली. यावेळी त्यांच्यात शाब्दिक वाद झाला.

त्यांनतर लतीफचा भाऊ अली याला परत कामावर घेता का असे विचारण्यास नांदगाव येथील भंगाराच्या दुकानात गेले असता समीरचा मुलगा रेहानने लोखंडी रोडने डोक्याच्या पाठीमागे मारून लतीफ याला जखमी गेले. रेहान याचा मित्र याने देखील लोखंडी पंचने पोटावर, पाठीवर मारले.

यावेळी लतीफचा मित्र आयुब शेख याला देखील हत्याराने मारून जखमी केले. त्यानंतर त्यांच्या एका मित्राने व समीर याने शिवीगाळ करून लाथा बुकयांनी मारहाण केली तसेच सेलेरिओ गाडीचे तोडफोड करून नुकसान केली. या प्रकरणी चौघाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# आरपीआय (आठवले) पक्षाच्या ६८व्या वर्धापन दिनाला अवकाळी पावसाचा फटका

**दै.रायगड नगरी । महाड**

महाड तालुक्यात आरपीआय (आठवले) पक्षाचा ६८ वा वर्धापनदिन ३ नोव्हेंबर रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्याची तब्बल दोन महिन्यांपासून जय्यत तयारी सुरू होती. केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या प्रमुख उपस्थितीत हा राज्यस्तरीय कार्यक्रम महाडच्या चांदे क्रीडांगणावर आयोजित करण्यात आला होता.

मात्र कार्यक्रमाच्या दिवशी अवकाळी पावसाने हजेरी लावली आणि संपूर्ण सोहळ्याचे तीन तेरा वाजले. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून हजारोंच्या संख्येने कार्यकर्ते महाडमध्ये दाखल झाले होते, धम्म बांधवांनी ऐतिहासिक चवदार तळे व शिवाजी चौक परिसरातही फेरफटका मारला. पण चांदे मैदानावर सततच्या पावसामुळे परिस्थिती हाताबाहेर गेली.

सभास्थळी लावण्यात आलेल्या अनेक खुर्च्या रिकाम्या राहिल्या. तर कार्यकर्त्यांना पावसापासून बचाव करण्यासाठी डोक्यावरच खुर्च्या धरून आसरा घ्यावा लागला. अचानक बरसलेल्या पावसाने वर्धापनदिनाचा पूर्ण कार्यक्रम गोंधळात पार पडल्याचे चित्र महाडमध्ये पाहायला मिळाले

# दोन ठिकाणी घरफोडी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एकाच रात्री पुष्पक नगर, वरचा ओवळा या ठिकाणी चोरट्यांनी दोन घरफोड्या करत लाखो रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात ३० ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

अंबादास उंबरे हे श्री गणेश सोसायटी सेक्टर एक, पुष्पकनगर, वरचा ओवळा येथे राहत असून ते रात्री जेवण करून झोपले होते. ३० ऑक्टोबर रोजी यांची पत्नी झोपेतून उठली असता घरातील सामान अस्ताव्यस्त व कपाट उघडे दिसले. त्यांनी पाहणी केली असता सोन्याचा नेकलेस, लहान पोत, सोन्याचे टॉप, अंगठी, रोख रक्कम, मोबाईल असा एकूण पाच लाख ७६ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी चोरून नेला. त्यांच्या शेजारील सोसायटीत राहणारे संजय झुगे (जेके प्राइड सोसायटी) यांच्या घरातून रोख रक्कम आणि मोबाईल चोरून नेला.

## पनवेल महानगरपालिका

**ता.पनवेल, जि.रायगड पनवेल ४१०२०६**

दुरध्वनी क्रमांक : ०२२-२७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं.०२-२७४५२२३३

ई-मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट : www.panvelcorporaton.com

जा.क्र.पमपा/बांधकाम/६५२५/प्र.क्र.२०५/४१७६/२०२५ दि.०४/११/२०२५

### जाहीर नोटीस

जनहित याचिका क्र.७१/२०१३ Interim Application (Ladgin) No.29119 of 2025 अंतर्गत मा.उच्च न्यायालयाने दि.१३/१०/२०२५ रोजीचे न्यायालयीन आदेशान्वये सुचना जारी केलेल्या आहेत. त्यानुसार रस्त्यावरील खड्डे बाबत मा.उच्च न्यायालयाने सर्व सामान्य जनतेस त्यांचे तक्रारी संदर्भात दाद मिळावी याकरिता समिती गठीत करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने नागरिकांचे सोईचे दृष्टीकोनातून पनवेल महानगरपालिकाद्वारे समिती गठीत करण्यात आलेली आहे. त्याबाबतची प्रसिद्धी पनवेल महानगरपालिकेच्या वेबसाईटवर करण्यात आलेली आहे.

नागरिकांचे सोईचे दृष्टीकोनातून पनवेल महानगरपालिकेने विभाग निहाय स्वतंत्र कक्ष निर्माण केलेले असून रस्त्यावरील खड्डे बाबत नागरिकांना तक्रारी दाखल करण्याचे अनुषंगाने विभाग निहाय खालील कनिष्ठ अभियंता यांची नोडल ऑफिसर म्हणून नियुक्ती केलेली आहे.

| अ. क्रं. | विभागाचे नाव | प्रभाग क्रं./ प्रभागाचे नाव | नोडल अधिकारी | भ्रमणध्वनी व व्हाटस्‌अप क्र. |
|---|---|---|---|---|
| १ | नावडे उपविभाग | १,२,३ | श्री.आशिष भास्करराव आरिकर | ९९६०९६९९४४ |
| २ | खारघर | ४,५,६ | श्री.अमोल अनंत नाईक | ९८३३९५४१३७ |
| ३ | कळंबोली | ७,८,९,१०,१५,१६ | श्री.शुभम अशोक रवंदळे | ७०२०४८५१५७ |
| ४ | कामोठे | ११,१२,१३,१४ | श्री.धनराज भगतशिंग राजपूत | ८४२१८०६१०६ |
| ५ | पनवेल, नवीन पनवेल व काळुंद्रे विभाग | १७,१८,१९,२० | श्री.सोमश अनिल शिंदे | ९६३७११३९६९ |

सर्व जनतेस याद्वारे आवाहन करण्यात येते की, रस्त्यावरील खड्डेबाबत तक्रार नोंदविण्याकरिता पनवेल महानगरपालिकेने नागरिकांकरिता खालील सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे.

१) पनवेल महानगरपालिका संकेतस्थळ www.panvelcorporation.com
२) मनपा मेल आयडी- panvelcorporation@gmail.com
३) रस्ता दुरुस्ती तक्रार संदर्भात कार्यालयनी दुरध्वनी क्र.०२२-२७४५८०४०/४१/४२
४) टोल फ्री क्र.१८००२२७७०१
५) panvel connect App :-
Helpline Number 8960916091

सही/-
अतिरिक्त आयुक्त-I
पनवेल महानगरपालिका

Government of Maharashtra
Public Works Department
(P.W.) Division, Panvel

Telephone No. 022-27452778 Email -panvel.ee@mahapwd.gov.in
E-Tender/O.No./P.W./PNL/ Date :-

**E- QUOTATION NOTICE NO. 28 YEAR-2024-25**
**(ONLINE E-TENDER)**
**PUBLIC WORK DIVISION, PANVEL**

The Rates of items which are not included in State Schedule Rates for the year 2023-24 are invited from appropriate suppliers at and around Taluka Panvel, District Raigad by Executive Engineer, Public Works Division, Panvel District Raigad 410206, Phone No. 022-27452778/022-27467440. The Sealed envelop containing rates of items shall reach the office on 06.11.2025 @ 10.00 hrs. to 13.11.2025 @ 18.00 hrs. by Online. The offers submitted/ received after this period will not be considered. If Possible the sealed envelopes will be opened on 14.11.2025 @ 18.00 hrs. in the Office of Executive Engineer, Public Works Division, Panvel, Taluka Panvel, District Raigad, Rights is reserved to reject any or all the offers without assigning any reason thereof by this office.

| Sr.No | Iten | Unit | Rate |
|---|---|---|---|
| १. | Technology provider to design process units as per the technology requirement to achieve the process gurantee, detailed engineering, procurement, supply and installation, testing and commissioning of Sewage Treatment Plant of 400 KLD capacity (400 KLD - Civil Unit for Phase I and 2 & Electromechanical Equipment to be supplied, erection & commisioning only for Phase 1 i.e., 200 KLD capacity) based on Membrane Bioreactor Technology with supply and erection of all electro- Mechanical and SCADA, instrumentaion equipments as per requirements detailed in tender document.<br><br>Scope of Supply for the STP shall include the follwing but not limited to:<br>i) Coarse Screen: 1 Nos<br>ii)Equalization Pump: 2 Nos (1W+1S) -10 m3/hr @ 15m Head-Non Clog Submersible Type<br>iii)Fine Screen: 2 Nos (1W+1S)<br>iv)Screen Collection box with chute: 2 Nos (1W+1S)<br>v)Mixer in Pre Anoxic: 1 Nos (Submersible Type of SS)<br>vi)Return Activated Sludge Pump:<br>a) Recycle pump set: 2 Nos (1W+1S)- 40m3/hr @ 15m Head-Non Clog self priming Horizontal Centrifugal Type<br>vii) Aeration Tank:<br>a) Fine Bubble Diffuser: As per design<br>b) Level Trasnsmiter: 1 Nos<br>c) DO transmeter: 1 Nos<br>viii) MBR Tank:<br>a) Submerged Membrane Units: As per design (MBR module shall be minimum 1 nos with 200 KLD capacity for phase 1)<br>ix) Permeate Pumps<br>a) Pumps: 2 Nos (1W+1S) -10 m3/hr @ 15m Head-Centrifugal type<br>x) Backwash Pumps<br>a) Pumps: 2 Nos (1W+1S)-As per technology provider<br>xi) CIP Pumps<br>a) Pumps: 2 Nos (1W+1S)-As per technology provider<br>b) CIP Tank: 1 Nos (HDPE/FRP)<br>xii) Blowers and accessories:<br>MBR Air Scour Blower, Pre Aeration, Equalisation and SHT<br>a) Blower: 2 Nos (1W+1S)- for tank, As per process requirment, Lobe Type for<br>b) Air Flow Transmitter: 1 Nos<br>xiii)UV Disinfection System: 2 nos (1 W+1S)-15m3/hr with minimum dosing of 60,000 uW-sec/sqcm<br>Hypochlorite dosing system for disifection<br>a) Pumps: 2 Nos (1W+1S)-As per technology provider<br>b) Dosing Tank: 1 Nos (HDPE/FRP)<br>xiv) Sludge Handling:<br>a) Centrifuge: 2No (1W+1S)-As per technology provider<br>b) Centriage Feed Pump: 2 Nos (1W+1S)<br>c) Pipe grid for sludge holding system and Polymer feed system: 1 Nos each<br>d) Polymer Feed System: 1 No each<br>xv) Electrical works:<br>a) PLC Control panel with SCADA: 1 Nos<br>b) MCC, Starter Panel, Power and welding sockets: As per process requirement (1 Duty)<br>c) Power and control cables, Cable tray, Local Push button station; 1 Nos Each<br>d) Earthing and safety equipments: 1 Nos<br>xvi)Online Monitoring System for measurement of pH, Flow, TDS, Turbidity, BOD,COD, & Data Acquisition System and if required, to be facilitated with connection for MPCB/CPCB server.<br>xvii) Equipment and civil units sizes are mentioned as minimum sizes, vendor can suggest as per their design to achive the process gurantee. " | Per No. | |

- Form Fee- Rs. 590/- (Online Payment only)
- The work rates should be exclusive of goods and service tax while submitting the rate sheet.
- The undersigned reserves the right to disapprove one or all of the tariff without assigning any reason.
- The said Rate Quotation Notice form can be viewed or purchased at the website https//mahatenders.gov.in and online Fee can be submitted. The detailed schedule of the said tenders, Corrigendum and other terms and conditions can be viewed on the above mentioned websites only.

विमाका/कोवि/२०२५-२०२६/१७७

Executive Engineer
P.W.Division
Panvel

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले. दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# डोलकाठीच्या तुऱ्या वर बांधण्यासाठीचा गरुड ध्वज ढाक डोंगरावरून आणला

**दै.रायगड नगरी । कर्जत**

देऊळवाडी किरवली येथील कार्तिक पौर्णिमेच्या उत्सवासाठी परंपरेनुसार डोलकाठीच्या टोकाला बांधण्यासाठी ढाक डोंगरावरील चढण्या – उतरण्यास अत्यंत कठीण असलेल्या भैरी मंदिरातून गरुड ध्वज आणला. यावेळी ढाक डोंगरावर गेलेल्यांमध्ये युवकांचा सहभाग होता. पाऊस असूनही या युवकांचा उत्साह कायम होता.

सकाळी गरुड ध्वजाची पूजा राजेश नेताजी बडेकर यांच्या हस्ते देऊळवाडी येथील मंदिरात करण्यात आली. त्यानंतर श्री ग्रामदेवी बहिरी तळई संस्थान, देऊळवाडी किरवली चे सचिव दिलीप बडेकर, पोलीस पाटील विवेक बडेकर, ज्ञानेश्वर जाधव, अनिल खंडागले, बिपिन बडेकर, अरविंद बडेकर, सनी गायकर, किरण गायकवाड, निखिल बडेकर, सोहम बडेकर, नयन बडेकर, नितीन बडेकर, सुरेंद्र रसाळ, प्रकाश बडेकर, सुनील अहिर, प्रशांत दिसले, केतन बडेकर, श्यामा बडेकर, जय बडेकर, बाळा बडेकर, शुभम बडेकर, अंकित गायकर, राज बडेकर, प्रतीक बडेकर आदी ग्रामस्थ गरुड ध्वज आणण्या साठी ढाक डोंगरावर गेले होते.

तो गरुडध्वज ढाक भैरी मंदिरात आणल्या नंतर गरुड ध्वजाची पूजा पोलीस पाटील विवेक बडेकर यांच्या हस्ते करण्यात आली. त्यानंतर दिलीप बडेकर यांच्या हस्ते करून अभिषेक करण्यात आला आणि देवतेला यात्रेला येण्याचे आवाहन केले. त्यानंतर हे सारे भाविक भक्त मार्गस्थ झाले. हा गरुड ध्वज देऊळ वाडी येथे आणण्यात आला. त्यावेळी प्रकशबुवा बडेकर यांनी पूजा केली. हा ध्वज मंगळवारी ४ नोव्हेंबर रोजी सकाळी साडे सात वाजता डोलकाठीला बांधण्यात येऊन ही डोलकाठी मंदिराजवळ उभी करण्यात येणार आहे.

बुधवार ५ नोव्हेंबर रोजी कार्तिक पौर्णिमेला या डोलकाठीचा मोर पिसाऱ्याने शिवमंदिरातील शिवपिंडीला आरतीच्या वेळी वारा घालून ही तीस फुट उंचीची डोलकाठी हनुवटीवर, दातांवर, कपाळावर व हातावर ठेऊन नाचविण्यात येते. हे दृश्य फारच रोमांचकारक असते.

मात्र यंदा कोरोनाचे संकट दूर झाल्याने परंपरागत असलेली यात्रा उत्साहात होणार असून हार – फुलांसह प्रसादाची व खेळण्यांची आदी दुकाने असणार आहेत.

# मौजे ओवे गाव फणसवाडी येथे मियावाकी पद्धतीने हरित क्षेत्र उभारणी : स्वरुप खारगे



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या संकल्पनेतून पर्यावरणपूरक आणि शाश्वत विकासाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून मौजे ओवे गाव, फणसवाडी येथे मियावाकी पद्धतीने हरित क्षेत्र उभारणीचा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून ओवे गाव राखीव वन (कंपार्टमेंट क्रमांक १५३–व) या ठिकाणी घनदाट हरित क्षेत्र निर्माण करून स्थानिक जैवविविधतेत भर घालण्याचा आणि परिसरातील हवेची गुणवत्ता सुधारण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. या अंतर्गत या मियाविकी हरित क्षेत्र प्रकल्पाच्या स्थळाची पाहणी आज दिनांक ०४ नोव्हेंबर २०२५ रोजी पनवेल महानगरपालिकेचे उप आयुक्त मा. स्वरूप खारगे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आली.

यावेळी पर्यावरण विभागाचे प्रमुख मनोज चव्हाण आणि लिपिक प्रवीण व्हलगळ तसेच संबंधित कंत्राटदार संस्थेचे प्रतिनिधी व कर्मचारी उपस्थित होते. या मियावाकी हरित क्षेत्रात बहावा, नीलमोहर, सीता अशोक, बॉटल ब्रश, गुलमोहर, पुत्रजीवी, ताम्हण अशा विविध झाडांचे रोपण करण्यात येत आहेत. यामध्ये एकुण ३३ हजार ५०० झाडांचे रोपण करण्यात येणार आहे. यापैकी आतापर्यंत ३१ हजार५०० झाडांचे रोपण करण्यात आले आहे.पाहणी दरम्यान उप आयुक्त मा. स्वरूप खारगे यांनी मियावाकी पद्धतीनुसार चालू असलेल्या कामाची प्रगती, लागवडीसाठी निवडण्यात आलेल्या प्रजातीची गुणवत्ता आणि क्षेत्राच्या देखरेखीवावत सविस्तर माहिती घेतली. यावेळी त्यांनी अधिकाऱ्यांना व कंत्राटदार प्रतिनिधींना गुणवत्तेला प्राधान्य देऊन काम पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. यावेळी त्यांच्या हस्ते प्रतीकात्मक वृक्षारोपण देखील करण्यात आले.

पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उप आयुक्त स्वरूप खारगे यांच्या देखरेखीखाली हा प्रकल्प पर्यावरणपूरक, शाश्वत आणि हिरवेगार पनवेल घडविण्यासाठी एक सक्षम पाऊल ठरणार आहे. पनवेल महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागामार्फत राबविण्यात येणारा हा मियावाकी प्रकल्प पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे, मियावाकी पद्धतीद्वारे अल्प कालावधीत दाट जंगल निर्मिती करता येते. या पद्धतीत स्थानिक प्रजातीच्या विविध झाडांची घनदाट लागवड करून, केवळ काही वर्षातच नैसर्गिक जंगलासारखे हरित क्षेत्र तयार होते. या प्रकल्पामुळे परिसरातील तापमान नियंत्रण, कार्बन शोषण, ध्वनी प्रदूषण कमी करणे तसेच पक्षी आणि कीटकांसाठी नैसर्गिक अधिवास निर्माण होण्यास मदत होईल. नागरिकांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण होण्यासही या उपक्रमाचा मोठा हातभार लागेल.

## जाहिर नोटीस

या जाहिर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. वासुदेव भिमराव कावडे, रा. पत्ता. भुखंड क्र. ७७/२७८, सेक्टर १, रुपश्री शाळे जवळ, घणसोली नवी मुंबई, ह्यांच्यामध्ये आणि खालील परिशिष्टात नमूद केलेल्या भूखंडांचे मालक श्री. मनोहर लक्ष्मण ओवळेकर, रा. पत्ता. तारघर, पोस्ट–उलवे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड – ४१०२०६, यांच्याकडून कायमस्वरूपी विकत घेतला असून त्यांच्या त्रिपक्षीय करारनामाद्वारे हस्तांतरण करू इच्छितात.

**सदर मिळकतीचे वर्णन**
**सिडको येथील संचिका क्र. उलवे १०८४**
**उलवे, तालुका– पनवेल, जिल्हा– रायगड**

| नोड | सेक्टर नं. | प्लॉट नं. | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|
| उलवे | २३ | ७१ | ४०.०० चौ.मी. |

तरी, वरिल वर्णन केलेल्या मिळकतीसंबंधी कोणत्याही व्यक्ती, संस्था, कंपनी किंवा बँकेचा दान, गहाण, तारण, लीन, चार्ज, विक्री, खरेदी किंवा अन्य कुठल्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बोजा अथवा हरकत असल्यास, त्यांनी त्यासंदर्भातील कागदोपत्री पुराव्यानिशी ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत खाली नमूद केलेल्या पत्त्यावर समक्ष येऊन मूळ कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी व त्याबाबत लेखी पोहोच घ्यावी.

वरील मुदतीत जर कोणत्याही व्यक्ती/संस्थेकडून हरकत नोंदविण्यात आली नाही, तर सदर मिळकत ही निर्वेध, निःजोखमी व कोणत्याही अडचणीशिवायची आहे असे समजून आमचे अशिल संबंधित व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर येणारी कुणाचीही हरकत ग्राह्य धरली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

कळावे.
दि.०४/११/२०२५

सही/–
**ॲड. अनुराधा पी. टिल्लू**
**ॲड. सुनिता राम पाटील**
**कार्यालय नं. २६, प्रभात सेंटर, सेक्टर–१ ए, ठाणे, नवी मुंबई –सीबीडी बेलापूर, ता. जि ४००६१४**

## आशियाना को – ऑप हौसिंग सोसायटी लिमिटेड

**नोंदणी क्रमांक:–आरजीडी/केएलआर/एचएसजी/टीसी–१५५०/२००२–२००३ दिनांक १४/०६/२००२**
**मुक्काम – रीस (चांभार्ली), पोस्ट मोहोपाडा, तालुका खालापूर, जिल्हा रायगड, पिनकोड– ४१०२२२**

### निविदा सूचना

सदर संस्थेचा पुनर्विकासाचा निर्णय संस्थेने घेतला असून संस्थेने नियुक्ती केलेले वास्तुविशारद यांनी याबाबतचा प्रकल्प अहवाल तयार केलेला आहे. सदर प्रकल्प अहवालाची माहिती संस्थेच्या कार्यालयात दिनांक ०६/११/२०२५ ते १०/११/२०२५ या कालावधीत सकाळी १०.०० वाजता ते दुपारी ३.०० वाजता यावेळेत इच्छुक विकासकांना पाहणी करता येईल व त्या आधारे इच्छुक विकासकाकडून निविदा दिनांक ११/११/२०२५ ते १८/११/२०२५ या कालावधीत सकाळी १०.०० ते संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत संस्थेच्या कार्यालयात जमा करण्यासाठी मागण्यात येत आहेत. निविदा मंजूर किंवा नामंजूर करणे हा सर्वस्वी अधिकार संस्थेच्या सर्वसाधारण सभेचा असेल त्यासाठी कोणतेही कारण देण्यास संस्था बांधील नाही.

ठिकाण : रीस (चांभार्ली)
दिनांक : ०५/११/२०२५

सही/– **श्री.अशोक मुंढे** अध्यक्ष

सही/– **श्री.देवानंद जगताप** सचिव

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, रायगड अलिबाग यांचे कार्यालय**
**काँग्रेस भुवन ट्रस्ट, तळमजला, महर्षी कर्वे, अलिबाग जि. रायगड**
दुरध्वनी क्रमांक ०२२४१–२२२०१७ ई–मेल ddr_rgd@rediffmail.com

जा.क्र.जिउनि/गृह/मोफा/नियो/जाहीर नोटीस/२१७७ सन २०२५
दिनांक :– २९/१०/२०२५

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यांस प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन, हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम १० (१) अन्वये प्राप्त अर्जावरील नोटीस**

अर्जदार नियो. श्री वरद विनायक सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. मुद्रे बुद्रुक, ता. कर्जत, जि. रायगड तर्फे मुख्यप्रवर्तक सौ शुभांगी सुभाष पालेकर, ता. कर्जत, जि. रायगड यांनी सौ. लता सरदार चव्हाण, विकासक व जमीन मालक, रा. मु.विठ्ठल नगर, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड–४१०२०१ यांचेविरुध्द महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियमाचे कलम १० (१) अन्वये संस्था नोंदणीचे निर्देश मिळणेकरीता अर्ज केला आहे.

अर्जदाराचे अर्जाबाबत सर्व सबंधीताना आपले म्हणणे सादर करणेसाठी संधी मिळावी म्हणून या कार्यालयाने सुनावणी घेतली आहे. त्यामध्ये सदर अर्जाबाबत गैरअर्जदार यांना नोटीस पाठविण्यांत येवून सदरची नोटीस त्यांना प्राप्त झालेली आहे. तरीही प्रतिवादी यांचेवतीने किंवा ते स्वतः सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत. सबब अर्जदाराने जाहीर पेपर नोटीस मागणी केली आहे. गैरअर्जदाराचे म्हणणे दाखल करणेसाठी अंतीम संधी देण्यांत येत असून त्यांनी प्रस्तावीत कार्यवाहीबाबत त्यांचे म्हणणे दिनांक ११/११/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता उपस्थित राहून मांडावे. तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर रहावे. यात कसूर झाल्यास त्यांची काहीही हरकत नाही असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २९/१०/२०२५

सही/–
**(प्र.का.जगताप)**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक**
**सहकारी संस्था, रायगड अलिबाग**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, रायगड अलिबाग यांचे कार्यालय**
**काँग्रेस भुवन ट्रस्ट, तळमजला, महर्षी कर्वे, अलिबाग जि. रायगड**
दुरध्वनी क्रमांक ०२२४१–२२२०१७ ई–मेल ddr_rgd@rediffmail.com

जा.क्र.जिउनि/गृह/मोफा क्र.११/मा.अभि./ जाहीर नोटीस/२१७८/सन२०२५
दिनांक :– २८/१०/२०२५

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यांस प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन, हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज मानिव अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेंयस बाबत) जाहीर नोटीस**

अर्जदार संस्था विकास को–ऑप हौसिंग सोसायटी लि. पनवेल, फायनल प्लॉट नं. ३८६/ए, लोकमान्य नगर, ता. पनवेल, जि. रायगड यांनी श्रीमती आशालता लक्ष्मण भेंडे, रा. सी–२, मनीष मार्केट, शिवाजी रोड, पनवेल श्रीमती सीमा अकील दिवाण, रा.४०२, कपिलेश्वर निवास, गावदेवी मंदिर शेजारी, पनवेल, श्रीमती स्मिता सुधाकर पाटील, रा. साई विहार, मारुती मंदिर समोर, शिवाजी रोड, पनवेल यांचे विरुध्द महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियमाचे कलम ११ (३) अन्वये खालील मालमत्तेचे एकतर्फी मानिव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र करुन मिळणे बाबत अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**

**पनवेल, फायनल प्लॉट नं. ३८६/ए, लोकमान्य नगर, ता. पनवेल, जि. रायगड येथील भूमापन क्रमांक–२५२/ब, क्षेत्र १३०२ चौ.मी..**

अर्जदाराचे अर्जाबाबत प्रतिवादी यांना नोटीस पाठविण्यांत येवून सदरची नोटीस त्यांना प्राप्त झालेली आहे. तरीही प्रतिवादी यांचेवतीने किंवा ते स्वतः सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत. सबब अर्जदाराने जाहीर पेपर नोटीस मागणी केली आहे. गैरअर्जदाराचे म्हणणे दाखल करणेसाठी अंतीम संधी देण्यांत येत असून त्यांनी वरील मिळकती बाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी प्रस्तावीत कार्यवाहीबाबत त्यांचे म्हणणे दिनांक ११/११/२०२५ रोजी दुपारी ११.३० वाजता उपस्थित राहून मांडावे. तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर रहावे. यात कसूर झाल्यास त्यांची काहीही हरकत नाही असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २८/१०/२०२५

सही/–
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक**
**सहकारी संस्था, रायगड अलिबाग**

# लोखंडी रॉडने मारहाण केल्या प्रकरणी तिघांविरोधात गुन्हा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महानगरपालिकेत अर्ज करून गॅरेज समोरील शेड तोडेल आणि गॅरेज बंद पाडेन असे बोलून लोखंडी रॉडने मारहाण केल्या प्रकरणी तिघांविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

खालीद खान राहणार फेस १, तळोजा हे त्यांचा मोठा भाऊ आणि काम करणारा मुलगा यांच्यासह तळोजा, सेक्टर २ येथील जारा ऑटो पार्ट्स या गॅरेजवर होते. यावेळी शादाब बेग व त्याचे मित्र सोहेल आणि नदीम अन्सारी यांनी तेथे येऊन धमकी दिली. आणि मोटरसायकलचे काम फ्री मध्ये करून देण्यास आणि प्रत्येक महिन्याला पाच हजार रुपये हप्ता म्हणून देण्यात सांगितले. हप्ता दिला नाही तर महानगरपालिकेत अर्ज करून गॅरेज समोरील शेड तोडेल आणि हातपाय तोडून येथून हिसकावून लावेल अशी धमकी दिली. त्याला नकार दिला असता शादाब बेग, सोहेल आणि नदीम अंसारी यांनी शिवीगाळ करून खालिद याला लोखंडी रॉडने मारहाण केली.

# फ्लॅट देण्याच्या बहाण्यात फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्वस्तात फ्लॅट देतो असे सांगून, प्रत्यक्षात फ्लॅट न देता भरलेली रक्कमही परत न केल्याप्रकरणी संभाजी शिवाजी सपकाळ नावाच्या व्यक्तीविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

दिलीप दळवी हे फणसपाडा, सीबीडी बेलापूर येथे राहत असून ते सेवानिवृत्त आहेत. त्यांनी संभाजी सपकाळ यांच्या ऑर्चिड ब्लोसॉम या नावाच्या प्रोजेक्टमध्ये फ्लॅट घेण्याचे ठरवले. यावेळी त्यांनी सात लाख आठ हजार रुपये चेक द्वारे दिले. यावेळी सपकाळ यांनी भरलेली रक्कम परत केली नाही किंवा व्यवहार रद्द झाल्यास व्याजासह रक्कमेचा एक चेक दिला होता. यावेळी प्रोजेक्टचे काम पूर्ण झाल्यानंतर बुकिंग प्रमाणे फ्लॅट देण्यात येतील असे सांगितले. २०१६ पासून पैसे घेऊन फ्लॅट देखील दिलेला नव्हता. दळवी है कंपनीच्या ऑफिसवर गेले असता ऑफिस बंद मिळून आले. मोबाईल क्रमांकवर संपर्क साधला असता उडवाउडवीची उत्तरे देऊन फोन उचलण्याचे बंद केले. दळवी यांच्याकडे दिलेला चेक त्यांनी बँकेत टाकला असता तो देखील बाऊन्स झाला.

**महेश शितोळे, तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी महाड यांचे न्यायालयात**

क्रि.चौ.अर्ज नं.१५१/२०२५

१. श्रीम. नौशीन सरफराज धनसे / नोशीन दाऊद ताज
रा.पांगळोली, ता.म्हसळा, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

१. मुख्याधिकारी,
महाड नगरपरिषद महाड ता. महाड, जि. रायगड — सामनेवाला

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, अर्जदार हे मूळचे महाड ता.महाड जि. रायगड येथील रहिवासी आहेत. अर्जदार यांचा जन्म दिनांक १०/०८/१९८९ रोजी मौजे महाड ता. महाड येथे झालेला आहे. त्यांच्या जन्माची नोंद मुख्याधिकारी नगरपरिषद महाड ता. महाड यांचे रजिस्टरला झालेली नाही. त्याकामी त्यांनी सदरची जन्म नोंद घालणेकामी या न्यायालयाकडे अर्ज केलेला आहे. त्याकामी सदर नोंदीस कोणाचीही काहीही हरवत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत स्वतः अगर आपले अखत्यारी, वकीलामार्फत न्यायालयात हजर राहून तशी लेखी हरकत कळवावी, तशी हरकत मुदतीत न आल्यास त्याचा कोणताही विचार न करता अर्जदार यांस सदरचा जन्म नोंद करण्याबाबतचा आदेश दिला जाईल त्याची नोंद घ्यावी.

ठिकाण : महाड
दिनांक : ०३/११/२०२५

सही/–
**तहसीलदार महाड**

## जाहीर नोटीस

या जाहिर नोटीसद्वारे लोकांना कळविण्यात येते की, मौजे टाकीगाव, ता. उरण, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत सुलभा संजय सोनावणे व इतर यांच्या मालकीची आहे.

| मौजे | गट क्रं. व उपविभाग | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| टाकीगाव | १५/१ | १–२७–३०<br>पो.ख. ०–०४–८०<br>एकूण १–३२–१० | १८.२५ |
| सदर मिळकती मध्ये १. दत्ता केशव जोशी २. आशा प्रसाद चव्हाण आणि ३. सुलभा संजय सोनावणे यांचा असलेला अविभाज्य हिस्सा | | | |

वर नमूद मिळकती या सदर मालकांनी विकण्याचे ठरविले असुन सदरची मिळकत आमचे अशिल यांनी कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत कोणाचा कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबध, दान, गहाण, पोटगी, लिज भाडेकरू, हक्क, मालकी हक्क व इतर कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसाच्या आत खालील नमूद पत्यावर पुराव्यासह लेखी हरकत नोंदवाव्यात. वरील मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व सदर मिळकती बाबत खरेदी खताचा /लिजचा व्यवहार पुरा केला जाईल याची नोंद घ्यावी.

दि.०३/११/२०२५

सही/–
**तृप्ती महेंद्र म्हात्रे**
**ॲडव्होकेट**
**९, दुसरा मजला, सुयोग सि.एच.एस., सातरहाटी उरण, ता. उरण,**
**फोन नं. ८८७९१४१२३२**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमीन मिळकत आमच्या अशिलांनी कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. सदरच्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मौजे : टेंभरी, ता.खालापूर, जि.रायगड येथील मिळकत : मिळकतीचे वर्णन**

| अ. क्रं. | कब्जेदार | गट नं./ हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | पो.ख. | पैकी विक्री करीत असलेले क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | धरमचंद पुनमचंद ओसवाल | ८/२ | ०–३३–७० | ०–१९–७० | ०.५३.४० | ३.२७ |
| २ | धरमचंद पुनमचंद ओसवाल | १२/१/अ/४ | ०–१९–०० | | ०.१९.०० | ०.०८ |
| ३ | सुरेश धरमचंद ओसवाल | १५/१ | ०–२१–६० | ०–०८–८० | ०.३०.४० | १.८१ |
| ४ | सुरेश धरमचंद ओसवाल | १६/१ | ०–२१–०० | ०–१५–९० | ०.३६.९० | १.४७ |
| ५ | धरमचंद पुनमचंद ओसवाल | २४/७ | ०–०५–०० | ०–०२–०० | ०.०७.०० | ०.०८ |
| ६ | धरमचंद पुनमचंद ओसवाल | २५/६/ड | ०–०७–०० | ०–०२–०० | ०.०९.०० | ०.०८ |
| ७ | धरमचंद पुनमचंद ओसवाल | २५/७/ब | ०–०३–०० | | ०.०३.०० | ०.०५ |
| ८ | धरमचंद पुनमचंद ओसवाल | २८ | ०–०४–३० | ०–००–८० | ०.०५.१० | ०.१६ |
| ९ | धरमचंद पुनमचंद ओसवाल | ५१/१/ब | ०–६८–३० | ०–२१–१० | ०.८९.४० | १.१५ |
| १० | धरमचंद पुनमचंद ओसवाल | ५१/१/अ/४ | ०–१७–७० | ०–०४–६० | ०.२२.३० | ०.२५ |
| ११ | धरमचंद पुनमचंद ओसवाल | ५३/३/ड | ०–१२–०० | ०–०४–०० | ०.१६.०० | ०.१२ |
| १२ | धरमचंद पुनमचंद ओसवाल | ५४ | ०–०४–८० | | ०.०४.८० | ०.१६ |
| १३ | धरमचंद पुनमचंद ओसवाल | ५५ | ०–०८–८० | ०–०२–८० | ०.११.६० | १.३७ |
| १४ | धरमचंद पुनमचंद ओसवाल | ५७/१ | ०–४०–५० | ०–१८–५० | ०.५९.०० | ३.५९ |
| १५ | धरमचंद पुनमचंद ओसवाल | ६१/२ | ०–०४–१० | ०–०१–५० | ०.०५.६० | ०.०३ |
| १६ | धरमचंद पुनमचंद ओसवाल | ६४/४ | ०–१८–०० | ०–०९–०० | ०.२७.०० | ०.२२ |
| १७ | धरमचंद पुनमचंद ओसवाल | ६५/१ | ०–४३–०० | ०–०८–०० | ०.५१.०० | ०.३४ |
| १८ | १) धरमचंद पुनमचंद ओसवाल<br>२) संगीता अशोक जैन<br>३) दिनेश बाबुलाल संघवी<br>४) अमर मलाराम गेहलोत<br>५) नाजूदेवी कपूरचंद गेहलोत<br>६) हरिया नांजीराम माली | ७२/१/अ | ०–८८–३० | ०–३७–२० | १.२५.५० | ०.७० |
| १९ | धरमचंद पुनमचंद ओसवाल | ७२/१/क | ०–१८–७० | ०–०४–६० | ०.२३.३० | १.७० |
| २० | धरमचंद पुनमचंद ओसवाल | ७२/१/इ | ०–१३–६० | ०–०१–२० | ०.१४.८० | १.३७ |
| २१ | धरमचंद पुनमचंद ओसवाल | ७५ | ०–१२–४० | ०–०९–६० | ०.२२.०० | ०.९१ |
| २२ | धरमचंद पुनमचंद ओसवाल | ७६/१/अ/३ | ०–१४–०० | ०–०६–५० | ०.२०.५० | ०.१७ |
| २३ | धरमचंद पुनमचंद ओसवाल | ७६/१/अ/४ | ०–३८–०० | ०–३६–०० | ०.७४.०० | ०.५५ |
| २४ | धरमचंद पुनमचंद ओसवाल | ७६/१/अ/६ | ०–०२–५० | ०–३–८० | ०.०६.३० | ०.१४ |
| २५ | १) धरमचंद पुनमचंद ओसवाल<br>२) धनाजी शंकर गायकवाड<br>३) मोनाली मधुकर क्षीरसागर<br>४) राजेश गोटीराम क्षीरसागर<br>५) रामदास गोटीराम क्षीरसागर<br>६) सिद्धार्थ मधुकर क्षीरसागर<br>७) गीता मधुकर क्षीरसागर | ७८/१ | ०–९९–२० | ०–५८–४० | १.५७.६० | २.७८ |
| २६ | धरमचंद पुनमचंद ओसवाल | ८३/४ | ०–०२–३० | ०–०१–०० | ०.०३.३० | ०.२८ |
| २७ | धरमचंद पुनमचंद ओसवाल | २४/१० | ०–०३–८० | ०–००–५० | ०.०४.३० | ०.४१ |
| २८ | १) निकेश नेमीचंद जैन<br>२) धरमचंद पुनमचंद ओसवाल | ४८/२/ब | ०–१७–९० | ०–१२–४० | ०.३०.३० | १.४४ |
| २९ | धरमचंद पुनमचंद ओसवाल | २४/७ | ०–०५–०० | ०–०२–०० | ०.०७.०० | ०.०८ |
| ३० | धरमचंद पुनमचंद ओसवाल | २५/६ ड | ०–०७–०० | ०–०२–०० | ०.०९.०० | ०.०८ |
| ३१ | धरमचंद पुनमचंद ओसवाल | ४०/१ | २–२२–२० | ०–७७–५० | ०.८३.०० | ११.२५ |

सबब सदर मिळकतीवर अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लिज तबदील, ट्रस्ट, वारसा या प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून सात (७) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार, ॲडव्होकेट यांचेकडे अगर खाली नमुद केलेल्या पत्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे कोणाचीही कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आणि बोजारहित व खरेदी घेणेस योग्य आहे असे समजुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती, तक्रारी कायमच्या सोडून दिल्या आहेत असे समजणेत येईल हे सर्व तमाम जनतेस कळावे.

दि.०३/११/२०२५

सही/–
**ॲड. आदिती पांडुरंग खंडाकळे**
**पत्ता: ००३, साई सिद्धी अपार्टमेंट, प्लॉट नं. ५७, मिडल क्लास हौ. सोसायटी पनवेल ४१०२०६**
**मो. नं. ९६१९६९३६७१**

# शेअर्स मार्केट ट्रेडिंगचे अमिष दाखवून फसवणूक करणाऱ्या आरोपींना अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शेअर्स मार्केट ट्रेडींगमध्ये गुंतवणूकीतून जास्त फायदा मिळवून देतो असे दाखवून वेगवेगळ्या बँक खात्यावर, गुंतवणुकीवर रक्कम पाठविण्यास सांगून सदर रक्कम परत न करणार्या ७ जणांच्या टोळीस नवी मुंबई सायबर पोलीस ठाण्याकडून अटक करण्यात आली आहे.



दिनांक ०२/०९/२०२५ ते ०८/१०/२०२५ रोजीचे कालावधीत आरोपींनी शेअर्स मार्केट ट्रेडिंग मध्ये गुंतवणुकीतून जास्त फायदा मिळवुन देण्याचे आमिष दाखवून फिर्यादी यांचा विश्वास संपादन करून, वेगवेगळ्या बँक खात्यावर, गुंतवणुकीकरिता रक्कम पाठवण्यास सांगितली. बनावट ॲपवर सदर गुंतविलेल्या रकमेवर मोठ्या प्रमाणात आभासी नफा दाखवुन फिर्यादींना मोठ्या प्रमाणात रक्कम गुंतविण्यास भाग पाडुन गुंतविलेली रक्कम परत न करता रू. १,०७,८०,०००/- ची आर्थिक फसवणुक केली. याबाबतचा गुन्हा ५१/२०२५ बी.एन.एस. कलम ३१९(२), ३१८(४), ३३६(२), ३३६(३), ३४०(२), ३ (५), सह कलम ६६(डी) आय.टी. ॲक्ट अधिनियम अन्वये अज्ञात आरोपी विरोधात गुन्हा दाखल केला होता. पोलीस आयुक्त, नवी मुंबई, मिलिंद भारंबे, पोलीस सह आयुक्त, संजय येनपुरे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), दीपक साकोरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), सचिन गुंजाळ यांनी सायबर फसवणूकीचे गुन्हे उघडकीस आणून त्यास प्रतिबंध करण्याबाबत कार्यवाही करण्याच्या सुचना दिलेल्या होत्या. व त्यासाठी प्रत्येक पोलीस ठाण्यांतर्गत सायबर युनिट स्थापन करण्यात आले होते. त्यामध्ये सहाय्यक पोलीस आयुक्त, आ.गु.शा. सायबर, श्रीमती प्रेरणा कट्टे यांचे मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाणेचे वपोनि विशाल पाटील व पोनि गणेश जाधव यांचे नेतृत्वामध्ये पोउपनिरी रोहित बंडगर, स. फौ. विजय आयरे (तांत्रीक तपास), पो.शि. पुनम गडगे (तांत्रीक तपास), पो. ना. रविराज कांबळे, पो.शि. भाऊसाहेब फटांगरे यांची नियुक्ती करण्यात आली होती. सायबर पो.स्टे.च्या पथकाने गुन्ह्यातील फिर्यादी यांची फसवणुकीची रक्कम वळते झालेले प्रथम स्तरावरील करंट अकाउंन्ट खाते धारक सुरेश तळेकर, वय २९ वर्षे, धंदा-बुर्जीपाव विक्री यास खराडी, पुणे येथुन दिनांक २९/१०/२०२५ रोजी अटक केली. तसेच त्याचा साथीदार विकास आव्हाड, वय ३० वर्षे, धंदा-नोकरी, रा.हवेली, खराडी, पुणे यास दिनांक ३१/१०/२०२५ रोजी अटक केली. गुन्हयातील आरोपी क्रमांक ०३ विशाल व्हनमाने, वय २४ वर्षे, धंदा-नोकरी, रा. गट नं १०३५, मदनेवस्ती, कोळवाडी, थेउर, पुणे यास ताब्यात घेवुन त्याचेकडे अधिक तपास करता आरोपीत हा टेलिग्राम ग्रुपवरील अनोळखी आयडी धारकांच्या संपर्कात येऊन त्याच्या टेलीग्राम वरील चॅटींगव्दारे तो प्रथम महापे, नवी मुंबई येथील एका हॉटेल मध्ये आला. तेथे त्याला तीन अनोळखी इसम भेटले. त्यांनी त्याचे करंट अकाउंन्टला लिंक असलेले सिमकार्ड त्याचेकडुन मागवून घेतले. सदर तीन अनोळखी इसम हे हिंदी भाषिक होते. त्यांच्या बोलण्यावरून ते परराज्यातील वाटत होते. सदर अनोळखी तीन इसम हे वारंवार नवी मुंबई मधील हॉटेल बदलत असल्याची माहिती आरोपीताकडे केलेल्या चौकशी मध्ये निष्पन्न झाल्याने तसेच आरोपी हा पहिल्यांदा नवी मुंबई येथे आल्याने त्याला कुठल्या हॉटेल मध्ये मुक्कामी होता हे सांगता येत नव्हते.

तपास पथकाने आरोपी कडे केलेल्या चौकशीच्या आधारे नवी मुंबई मधील महापे, सानपाडा, कोपरखैरणे, ए.पी.एम.सी. व वाशी येथील विविध साधारण ३५ ते ४० लॉज व हॉटेलची तपासणी करून अहोरात्र मेहनत करुन, पारंपरिक व आधुनिक तंत्रज्ञानाचा कौशल्य पूर्ण वापर करून ए.पी.एम.सी. वाशी येथील हॉटेल राधे रेसिडेंसी येथून ५ आरोपीतांना ताब्यात घेऊन त्यांना सदर गुन्ह्यात अटक केले.

आरोपीकडे अधिक चौकशी केली असता यातील तीन आरोपी हे टेलिग्राम ॲपद्वारे चायना व कंबोडीया येथील सायबर फॉडस्टर यांच्या संपर्कात होते. तसेच सदर आरोपी हे त्यांच्या कडील असलेल्या मोबाईल मध्ये विविध राज्यांमधून आलेल्या करंट अकाउंट धारकांचे अकाउंटला लिंक असलेले सिमकार्ड हे स्वतः कडील मोबाईल मध्ये टाकून चायना व कंबोडीया मधील सायबर फॉडस्टर यांना ेज्ञरू से डचड डशपवशी ॲपद्वारे करंट बैंक अकाउंट ट्रानझेक्शनचे (ओटीपी) फॉरवर्ड करुन ट्रांनझेक्शन करायचे. सदरच्या गुन्हयामध्ये भारत देशातील विविध राज्यातील ११८ बँक खाते गोठविले असुन त्यामध्ये एकुण रक्कम रूपये ३२,५०,०००/- (रूपये बत्तीस लाख पन्नास हजार मात्र) गोठवण्यात आले आहेत. सदर गुन्हयाचा तपास सायबर पोलीस ठाणेचे वपोनि. श्री. विशाल पाटील करित आहेत.

आरोपीतांकडुन टेलिग्राम, इंस्टाग्राम, व्हॉट्सअप, फेसबुक तसेच इतर सोशल मिडीया वर शेअर्स मार्केट मध्ये गुंतवणुक करण्याची जाहिरात बनवुन मोठ्या प्रमाणात नफा मिळवण्याचे आमिष दाखवण्यात येते. त्यानंतर त्यांनीच बनविलेल्या बनावट वेबपोर्टल वर जास्तीचा आभासी फायदा दाखवुन जास्तीत जास्त गुंतवणुक करण्यास भाग पाडुन फसवणुक करतात. याद्वारे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, टेलिग्राम, इंस्टाग्राम, व्हॉट्सअप, फेसबुक तसेच इतर सोशल मिडीया वर शेअर्स मार्केट मध्ये गुंतवणुकीच्या जाहिरातींची खात्री करा, त्यांना आपली कोणतीही वैयक्तिक माहिती देवू नका व कोणतेही आर्थिक व्यवहार करू नका. जास्त नफा मिळविण्याच्या प्रलोभनाला बळी पडू नका.

# आयओटीएल (जेएनपीटी) कंपनीतील कामगारांसाठी पगारवाढीचा करार

## कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांची यशस्वी मध्यस्थी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांच्या नेतृत्वातील न्यु मॅरीटाईम ॲन्ड जनरल कामगार संघटनेचा आलेख दिवसेंदिवस वाढत चाललेला दिसत आहे. संघटनेच्या माध्यमातून या वर्षातील हा ९ वा पगारवाढीचा करार १ नोव्हेंबर रोजी करण्यात झाला.



IOTL या केंद्र सरकारच्या उपक्रमातील मे. CIEL या कंत्राटाअंतर्गत काम करणाऱ्या कामगारांना केंद्र शासनाचा किमानवेतन मिळावा अशी मागणी कामगारांनी न्यु मॅरीटाईम ॲन्ड जनरल कामगार संघटनेचे सभासदत्व स्विकारल्यामुळे लावून धरली होती त्या मागणीला यश येवून कामगारांना केंद्र शासनाचा किमान वेतन देण्याचा करार करण्यात आला. त्याचबरोबर ८.३३% बोनस, मेडिक्लेम पॉलिसी, भरपगारी रजा देण्याचे मान्य करण्यात आले आहे. या पगारवाढीमुळे कामगारांना किमान तीन ते सात हजार रुपयांची पगारवाढ होणार आहे. तसेच जून २०२४ पासून या पगारवाढीचा फरक मिळणार आहे त्यामुळे कामगारांची पुन्हा दिवाळी होणार आहे.

या पगारवाढीच्या करारनाम्या प्रसंगी न्यु मॅरीटाईम ॲन्ड जनरल कामगार संघटनेचे अध्यक्ष कामगार नेते महेंद्रशेठ घरत, सरचिटणीस वैभव पाटील, उपाध्यक्ष किरीट पाटील, विनोद म्हात्रे, सचिव लंकेश ठाकूर, अजित ठाकूर, तर व्यवस्थापनातर्फे श्री. संदीप काळे (सिनियर मॅनेजर HR IR IOTL) श्री. आकाश तन्ना (रिजनल मॅनेजर उखएड) कामगार प्रतिनिधी, श्री. राहुल ठाकूर, दिपक ठाकूर, शशिश कांबळे आदी उपस्थीत होते. या पगारवाढीमुळे कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

# करंजाडेत डेब्रीज टाकण्यासाठी आलेल्या डंपर्सवर कारवाई दोन डंपर्स जप्त

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सिडकोने संपादित केलेल्या जमिनींवर तसेच संपादिक करण्यात येत असलेल्या भूखंडावर बेकायदा डेब्रिज टाकणाऱ्या डंपर बरोबर त्यांच्या चालकांना रंगेहाथ पकडून या प्रकारांना आळा घालण्यासाठी सिडको प्रशासनाने कंबर कसली आहे. त्याचाच एक भाग म्हणून सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने नुकतीच करंजाडे नोड से-३ करंजाडे येथे सिडकोच्या कार्यक्षेत्रात डेब्रीज खाली करणाऱ्या दोन डंपर्सवर कारवाई करून ते जप्त करण्यासह चालकांविरोधात पनवेल शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

मुंबईतील राडा रोडा नवी मुंबई परिसरात दिवसा तसेच रात्रीच्या अंधारात गुपचूपपणे टाकण्याचे प्रकार वाढले आहेत. अशाच प्रकारे राडा रोडा घेऊन एक डंपर करंजाडे नोड से-३ येथे येत असल्याची माहिती सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांना मिळाली होती. त्यानुसार त्यांच्या मार्गदर्शनाखाली दक्षता तपास अधिकारी, सुरक्षा विभाग, करंजाडेत डेब्रीज टाकण्यासाठी आलेल्या एमएच-४६- बीयू-७४९४ व डंपर क्रमांक एमएच-४६-बीएम-०३१३ वरील चालक हे त्यांच्या ताब्यातील डंपर मधून मानवी जिवितास व लोकांच्या आरोग्यास धोकादायक असलेले डेब्रीज हे अनधिकृतपणे आणून करंजाडे नोड से-३ याठिकाणी सिडको कार्यक्षेत्रात खाली करत असतांना मिळून आले.

यावेळी भरारी पथकाने दोन्ही डंपर जप्त केले असून याबाबत चालक पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

दैनिक रायगड नगरी
बातम्या व जाहिरातींचे उत्तम माध्यम
संपर्क : ९६१९९७९७०६ / ९६१९७३७९११

# प्रादेशिक कृषी संशोधन केंद्रासाठी संपादित केलेल्या शेतकऱ्यांच्या भूमिपुत्रांना नोकरीत सामावून घ्या अन्यथा उपोषण करणार

**दै.रायगड नगरी । कर्जत**

प्रादेशिक कृषी संशोधन केंद्रासाठी संपादित केलेल्या शेतकऱ्यांच्या भूमिपुत्रांना नोकरीत सामावून घ्या अन्यथा उपोषण करणार; असा इशारा सामाजिक कार्यकर्ते अमोघ कुळकर्णी यांचा प्रशासनाला दिला आहे याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले आहे.




कर्जत मध्ये प्रादेशिक कृषी संशोधन केंद्र असून या केंद्राला सुमारे १०५ वर्ष झाले आहेत. १९५६ मध्ये भात शेतीवर अर्थात नवनवीन बियाणांचा शोध संशोधनासाठी जागेची गरज असल्याने कर्जत नगर परिषद हद्दीतील भिसे गाव आणि मुद्रे तसेच हालीवली येथील शेतकऱ्यांची जागा मोठ्या प्रमाणात संपादित करण्यात आली.

मधल्या काळात संबंधित प्रशासनाने या संपादित केलेल्या जमीन मालकांच्या वारसांना (भूमिपुत्रांना) त्यांच्या शैक्षणिक पात्रतेप्रमाणे सरकारी सेवेत सामावून घेण्यासाठी हालचाली सुरू केल्या होत्या. संबंधितांना तसे दाखले ही देण्यात आले होते. मात्र आता प्रत्यक्षात सरकारी सेवेच्या पदभरतीवेळी कर्जत मधील या भूमिपुत्रांना वगळून फक्त दापोली परिसरातील मुलांनाच नोकऱ्या देत असल्याचे दिसून आल्याने कर्जत मधील यासंबंधी शेतकऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

याचीच दखल घेत कर्जतचे युवा सेनेचे पश्चिम शहराध्यक्ष अमोघ कुळकर्णी यांनी आवाज उठविला असून कर्जतच्या या भूमिपुत्रांना सरकारी सेवेत सामावून घेणे अन्यथा प्रशासना विरोधात उपोषणाचे हत्यार उपसण्यातील येईल असा इशारा दिला असून यासंबंधीचे निवेदन जिल्हाधिकारी यांना सादर केले आहे.

शंभर वर्षे पूर्ण केलेल्या आशिया खंडातील या कर्जत प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राचे योगदान फार मोठे आहे. आजवर त्यांनी भाताच्या अनेक यशस्वी बी बियाणांचा शोध लावून निर्मिती केली आहे. ही बाब नक्कीच अभिमानास्पद असली तरी या संशोधन केंद्रासाठी पूर्वीच्या काळी जी मोठ्या प्रमाणात जागा लागणार होती ती येथील स्थानिक शेतकऱ्यांनी मोठ्या मनाने प्रगत शेतीच्या हिताचा विचार करता कर्जत प्रादेशिक कृषी केंद्राला शेत जमीन तथा जागा संपादित करू दिली. त्यामुळेच या जागेवर प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राला रिसर्च सेंटर उभारणे शक्य झाले आणि ते आज त्याच माध्यमातून कर्जत एक दोन अशा अनेक बियाणांची निर्मिती यशस्वीरित्या करणे शक्य झाले आहे.

मागील काळात प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राने कर्जत मधील ज्या शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी कृषी केंद्राला दिले आहेत अशांना त्यांच्यामार्फत शैक्षणिक पात्रतेप्रमाणे नोकरी देण्यात येईल अशी जाहिरात प्रसिद्ध केली होती. तसेच या भूमिपुत्रांचे दाखले सुद्धा मागून घेतले होते. त्यामुळे सदर भूमिपुत्रांच्या सरकारी सेवेत का मिळणार अशा आशा पल्लवीत झाल्या होत्या. त्यावेळी या संदर्भातील पदभरती जाहिरात पाहून सदर भूमिपुत्रांनी आपले अर्ज दाखल केले होते. आणि विशेष म्हणजे शैक्षणिक दृष्ट्या ते या पदभरतीसाठी पात्रही होते. तरीसुद्धा त्यांना पदभरतीत समाविष्ट करून घेण्यात आले नाही. यासंदर्भात त्यावेळी कर्जत उपविभागीय अधिकारी यांच्याकडे या स्थानिक भूमिपुत्रांनी याबाबत निवेदन सादर केले होते मात्र त्यावर कोणतीच योग्य ती कार्यवाही न झाल्याने सदर भूमिपुत्रांमध्ये नैराश्य आले.

# जिल्ह्यात दि.१७ नोव्हेंबर ते ०२ डिसेंबर २०२५ या कालावधीत कुष्ठरोग शोध मोहीम अभियानाचे आयोजन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्ह्यात दि.१७ नोव्हेंबर ते दि.०२ डिसेंबर २०२५ या कालावधीत कुष्ठरोग शोध मोहीम अभियान राबविण्यात येणार असून २०२७ पर्यंत जिल्हयात कुष्ठरोग्याची संख्या शून्यावर आणण्यासाठी अर्थात शून्य कुष्ठरुग्ण प्रसार हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जिल्हा प्रशासन काम करीत आहे. या मोहिमेदरम्यान जिल्ह्यातील ग्रामीण भागातील लोकसंख्येचे १०० टक्के व शहरी भागातील जोखीमग्रस्त ३० टक्के लोकसंख्येचे प्रत्यक्ष तपासणी करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील एकूण ५ लाख ६ हजार ८४१ घरांना आशा सेविका व स्वयंसेवक भेटी देणार असून एकूण २३ लाख ३० हजार ८७१ लोकसंख्यंचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. तरी या मोहिमेदरम्यान घरी येणाऱ्या आरोग्य पथकास सहकार्य करावे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी जिल्ह्यातील नागरिकांना केले आहे.

मोहिमेचा उद्देश:- समाजातील निदान न झालेले कुष्ठरुग्ण लवकरात लवकर शोधून त्यांना त्वरित बहुविध औषधोपचाराखाली आणणे. नवीन कुष्ठरुग्ण शोधून बहुविध औषधोपचाराद्वारे संसर्गाची साखळी खंडित करुन होणारा प्रसार कमी करणे, समाजात कुष्ठरोगाविषयी जनजागृती करणे. सन २०२७ पर्यंत कुष्ठरोगाचा प्रसार रोखणे, हे ध्येय साध्य करण्याच्या दिशेने वाटचाल करणे. कुष्ठरोग हा मायक्रोबॅक्टेरियम लेप्रे नावाच्या जंतूमुळे होतो. या जंतूमुळे त्वचेवर, नास्तवर आणि शरीराच्या नसा इतर अवयवावर परिणाम होतो.

कुष्ठरोगाची लक्षणे- शरीराच्या कुठल्याही भागावर फिकट लालसर न खाजणारा बधीर चट्टा-डाग, त्या ठिकाणी घाम न येणे, जाड बधीर तेलकट त्वचा, त्वचेवर लहान लालसर गाठी असणे, कानाच्या पाळ्या जाड होणे, त्वचेवर थंड व गरम संवेदना न जाणवणे, भुवयांचे केस विरळ होणे, डोळे पूर्णपणे बंद करता न येणे, हातातून वस्तू गळून पडणे, चालताना पायातून चप्पल निसटणे, हाताची व पायाची बोटे वाकडे असणे,) हात मानेपासून पाय घोट्यापासून लुळा पडणे.

या मोहिमेदरम्यान जिल्ह्यातील ग्रामीण भागातील लोकसंख्येचे १०० टक्के व शहरी भागातील जोखीमग्रस्त ३० टक्के लोकसंख्येचे प्रत्यक्ष तपासणी करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील एकूण ५ लाख ६ हजार ८४१ घरांना आशा सेविका व स्वयंसेवक भेटी देणार असून एकूण २३ लाख ३० हजार ८७१ लोकसंख्यंचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. यासाठी एकूण १ हजार ९९५ पथके व ३७५ पर्यवेक्षवा यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. सध्या रायगड जिल्ह्यामध्ये ३९० कुष्ठरुग्ण औषधोपचाराखाली आहे.

या मोहिमेदरम्यान आशा सेविका, स्वयंसेवक व आरोग्य कर्मचारी घरोघरी जावून सर्वेक्षण करून संशयित कुष्ठरुग्ण शोधणार असून नागरिकांनी आजाराबाबत गैरसमज व भीती न बाळगता घरी येणाऱ्या पथकाला सहकार्य करावे. तसेच जनजागृती, तपासणी व उपचार या त्रिसूत्रीने कुष्ठरुग्ण शोध अभियान यशस्वी करावे, असे आवाहन जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नेहा भोसले यांनी केले आहे.

# हेक्टरी ५० हजार नुकसान भरपाई जाहीर करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना शेतकरी संघातर्फे निवेदन

**दै.रायगड नगरी । उरण**

शासकीय कृषी पुरस्कार प्राप्त शेतकरी संघ महाराष्ट्र राज्य अंतर्गत रायगड जिल्हा अध्यक्ष तथा शेतीनिष्ठ शेतकरी प्रफुल्ल खारपाटील, शेतीनिष्ठ शेतकरी व उपाध्यक्ष सज्जन पवार, शेतीनिष्ठ शेतकरी महाराष्ट्र राज्य समितीचे सदस्य संतोष देवकर, कृषिभूषण अनंत भोईर, बळीराम म्हात्रे, सागर सागडे, ज्ञानदेव पवार, विश्वास पवार, सचिन गावंड तसेच अन्य कृषीभूषण शेतकऱ्यांच्या वतीने रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांना ओला दुष्काळ जाहीर करून, शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी ५० हजार रुपये नुकसान भरपाई देण्यात यावी. तसेच भातपीक व आंबापिक विम्याच्या जाचक अटी रद्द करण्यात याव्यात.

अशा प्रकारचे लेखी निवेदन काल सोमवारी रोजी अलिबाग येथे देण्यात आले आहे. यंदा ऑक्टोबर महिन्यामध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे येथील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, नोव्हेंबर महिना उगवला तरी अजूनही पाऊस बरसत आहे. या बरसणाऱ्या पावसामुळे भात शेतीबरोबरच कडधान्य व आंबा पिकांचेही नुकसान होणार असल्याने, शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. अजून खरिपातील शेतकऱ्यांचे भाताचे एकमेव नगदी पीक घरी आले नाही. रब्बी पिकेही यावर्षी बेभरोशाची झाली आहेत.या अवकाळीच्या अस्मानी संकटाने शेतकऱ्यांच्या तोंडचा घास हिरावून नेला आहे.

भातपिके पाण्यात भिजून त्यापासून मिळणारा पेंढासुद्धा उन्हाळ्यात गुरांच्या चाऱ्यासाठी उपयोगी येणार नाही. अशी बिकट अवस्था शेतकऱ्यांची झाली आहे. या ऋतुचक्रातील अस्थिरतेमुळे कोकणातील शेतकरी आर्थिक अडचणीत आला असून, कष्टाने पिकविलेल्या पिकांचा चिखल झाला असून, शेतकऱ्यांच्या स्वप्नांची माती झाली आहे. या अस्मानी संकटाच्या पार्श्वभूमीवर शासनाने तातडीने मदतीची पावले उचलावीत आणि ओला दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी या निवेदनातून शेतकऱ्यांच्या वतीने करण्यात आली आहे.